# बचत गटाच्या माध्यमातून महिलांचे सशक्तीकरण आणि विकास

**प्रा.एस जे पाटील** अर्थशास्त्र विभाग प्रमुख कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय कोवाड, ता-चंदगड,जि.कोल्हापूर
E mail. – sjpatilsir71@gmail.com
**प्राचार्या.डॉ तेजस्विनी बी मुडेकर** कमला कॉलेज कोल्हापूर Email.Id – tbmudekar@gmail.com

---

- **प्रस्तावना :-**

भारताला स्वातंत्र्य मिळून ७७ वर्ष पूर्ण झाली परंतु समाज व्यवस्थेत सर्वच क्षेत्रात स्त्रियांना आज हि आर्थिक,सामाजिक,राजकीय आणि कौटुंबिक पातळीवर दुय्यम दर्जा दिला जातो पुरुष प्रधान संस्कृतीमुळे विशेषतः ग्रामीण महिला "चूल आणि मुल" सांभाळून आपल्या कुटुंबासाठी आयुष्यभर काबाडकष्ट करतात. पूर्ववैदिक कालखंड वगळता इतर कालखंडात महिलांच्या दर्जात घसरणच झाली. मध्ययुगीन कालखंडात तर अनेक जाचक बंधने स्त्रियांच्यावर होती.स्त्रिया ह्या आर्थिकदृष्ट्या परावलंबी दिसून येतात. कारण कुटुंबाची आर्थिक जबाबदारी हि पुरुषांचीच होती. आणि ती आजही आहेच त्यामुळे आजच्या काळात व्यक्तीचा सामाजिक आर्थिक दर्जा निश्चित करताना "सशक्तीकरण" या अर्थाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.त्यामुळे महिलांना ग्रामीण असो किंवा शहरी असो

महिलांना आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी बनवून तिच्या कर्तुत्वाला वाव देण्यासाठी एक नवे माध्यम म्हणून "स्वयंसहाय्यता गटाची निर्मिती झाली.

भारतासारख्या कृषिप्रधान व विकसनशील देशातील एकूण लोकसंख्येपैकी ५० टक्के महिलांचे प्रमाण असणाऱ्या देशात समाजातील महिलांना मानाचे स्थान प्राप्त करून देण्यासाठी शिवाय त्यांच्या जीवनात समृद्धी आणण्यांसाठी भारताने स्वयंसहायता गटाच्या माध्यमातून अतिशय महत्त्वाचे पाऊल उचल्यामुळे आज विशेषतः ग्रामीण व शहरी मागासलेल्या तसेच कमी उपन्न असणाऱ्या कुटुंबातील महिलांना ताठ मानेने समाजामध्ये राहण्याची व समृद्ध जीवन जगण्याची सुवर्णसंधी बचत गटांनी प्राप्त करून दिली आहे.

अलिकडच्या काळात देशाचा विकास करण्यासाठी अनेक योजना कार्यान्वित करण्यात आल्या आहेत . त्यांचा प्रभाव हि भारतीय अर्थकारणावर चांगला पडला असल्याचे पाहायला मिळत आहे.देशातील विविध क्षेत्रातील समाधानकारक प्रगती लक्षात घेऊन भारत २०४७ पर्यंत जागतिक महासत्ता बनेल असे आशादायी गणित मांडले असले तरी जोपर्यंत देशातील महिलांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणले जात नाही तोपर्यंत भारताच्या आर्थिक महासत्तेची कल्पना करणे योग्य होणार नाही ह्याकरिता महिला बचत गट महिलांच्या आर्थिक विकासाकरिता प्रभावी माध्यम म्हणून समोर येत आहे.बचत गटातील महिला कुटुंबाला दारिद्र्याच्या संकटातून बाहेर काढून आर्थिकदृष्ट्या सक्षम होऊन स्वतःच्या व्यक्तीमत्त्वाचा विकास करीत आहेत.

- **अभ्यासाची उद्दिष्ट्ये –**

1. महिला सशक्तीकरण संकल्पना समजावून घेणे.
2. महिलांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी बचत गटाच्या योगदानाची माहिती घेणे
3. महाराष्ट्रातील बचत गटाच्या वाटचालीचा अभ्यास करणे
4. बचत गटातील महिलांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासाचा अभ्यास करणे

- संशोधन विषयाची गृहिते –

1. बचतगटामुळे महिला आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी होत आहेत.
2. महिला बचत गटाच्या स्थापनेमुळे महिलाच्या व्यक्तीमत्त्वाचा विकास होत आहेत.

- **संशोधन पद्धती –**

प्रस्तुत शोधनिबंध तयार करण्यासाठी प्राथमिक आणि दुय्यम साधन सामग्रीच्या पद्धतीचा उपयोग करण्यात आलेला आहे.ह्यामध्ये चंदगड तालुक्यातील यशस्वी महिला बचत गटांना प्रत्यक्ष भेट देऊन महिलांचे स्वावलंबन आणि व्यक्तीमत्त्व विकासासंदर्भात माहिती प्राप्त करण्यात आलेली आहे.दुय्यम साधन संकलन पद्धती मध्ये वर्तमानपत्रे, मासिके, संशोधन पेपर प्रकाशित पुस्तके आणि इंटरनेट इत्यादीचा आधार घेण्यात आला आहे.

- महिला सशक्तीकरणाची संकल्पना –

सन २००१ हे वर्ष महिला सबलीकरण वर्ष मानले जात असले तरी महिला सक्षमीकरणाची संकल्पना सर्वप्रथम १९७५ साली नैरोबी येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय महिला परिषदेत मांडण्यात आली. या परिषदेत सक्षमीकरणाची व्याख्या पुढीलप्रमाणे केली. "स्त्रियांच्या बाजूने विशेष असे सत्तेचे वितरण करावे आणि साधनसंपत्तीचे नियंत्रण करणे म्हणजे महिला सशक्तीकरण होय"

१९८७ मध्ये युनोने जागतिक महिला स्तरावरील कार्यशाळेत व्हीनेसा ग्रिफेनने व्याख्या केली त्यामध्ये असे म्हटले आहे की,स्त्रीच्या अंगी निर्णय घेण्याची नियंत्रण करण्याची, संघटीत करण्याची क्षमता, मतप्रदर्शन करणे, कृतीशील उपक्रम घडवून आणणे, लोकसंपर्क जनसंपर्क आर्थिक व्यवहार इत्यादी करण्याची क्षमता व आवड होणे त्याला महिला सबलीकरण असे म्हणतात.

- महिला बचत गटाची पार्श्वभूमी –

महिला बचत गटाच्या संकल्पनेचे खरे श्रेय जाते ते बांगलादेशालाच महिलाच्या बचत गटाची सुरुवात बांगला देशातूनच झाली. तेथील ग्रामीण बँकेत गरिबांच्या जीवनात अक्षरशः आर्थिक क्रांती घडवून आणली . याच देशाने बचत गटांची संकल्पना सांगितली, शिकवली, रुजवली आणि ग्रामीण बँकेच्या माध्यमातून आपल्या समोर आदर्श निर्माण केला. बांगलादेशातील बचत गटांच्या चळवळीतूनच प्रेरणा घेऊन भारताने बचत गटाची चळवळ उभी केली.बांगला देशात १९७० पर्यंत बचत गट किंवा सूक्ष्मवित्त हे शब्द हि माहित नव्हते पण नंतर हे दोन शब्द बांगला देशवासीयांच्या परवलीचे झाले.

मोहम्मद युनस हे बांगला देशातील चित्तगाव विद्यापीठात अर्थशास्त्र विभागप्रमुख म्हणून कार्यरत होते.आज ते बांगला देशाचे सर्वासर्वे आहेत.ते महिला बचत गटाचे खरे प्रणेते आहेत.त्यांच्या कार्याची जागतिक स्तरावर दखल घेऊन त्यांना अत्यंत प्रतिष्ठेच्या नोबेल पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.त्यांनी "थेंब थेंब तळे साचे" या उक्तीप्रमाणे बांगला देशातील गरीब कुटुंबातील महिलांना बंचात गटाच्या माध्यमातून एकत्र आणून पैसे बचत करण्यास प्रोत्साहित केले. ग्रामीण बँकेच्या माध्यमातून त्या देशातील गरिबी दूर करण्याचा यशस्वी प्रयोग केला त्याची दखल सयुंक्त राष्ट्रसंघ, जागतिक बँक, इंटरनेशनल मोनेटरी पोलिसी या सारख्या जागतिक स्तरावरील संस्थांनी हि घेतली.त्यांनी केलेल्या या कार्यामुळे महिलाच्या आर्थिक उन्नतीबरोबरच सकारत्मक बदल व एक नवी दिशा प्राप्त झाली देशात आज ग्रामीण बँकेचे ४० लाख सदस्य आहेत. यामध्ये ९० टक्के महिला या बँकेच्या मालक आहेत. त्या महिला बँकेच्या भागधारक असून ९० टक्के शेअर्स त्यांच्याच मालकीचे आहेत उर्वरित १० टक्के शेअर्स बांगलादेश सरकारच्या मालकीचे आहेत. डॉ.युनुस यांनी मायक्रो फायनान्स च्या माध्यमातून बांगला देशातील गरीब लोकांना प्रगतीची संधी उपलब्ध करून दिली म्हणून बांगला देशातील मायक्रोफायनान्स हे मॉडेल आज जग भरात प्रसिद्ध झाले आहेत.

- भारतातील बचत गटांचे स्वरूप :-


१९९० च्या दशकात बचतगटांची चळवळ धोरणात्मकरित्या राबविण्यात आली त्यामुळे बचत गटाच्या चळवळीने क्रांतीकारक स्वरूप धारण केले सन १९८३ ते १९९३ य कालावधीत बचत गटांना प्रचंड यश मिळाले मध्यमवर्गीय आणि गरीब महिलांच्या आर्थिक उन्नतीच्या दृष्टीने बचत गटाची चळवळ यशस्वी होताना दिसत आहे. या बचत गटामुळे आर्थिक परिस्थितीत सुधारणा होण्यास मदत झाली आहे.स्वयंसहायत्ता महिला बचत गट हे विशेषतः महिलाकडून चालविले जातात त्यामुळे महिलांच्या सर्वांगीण विकासास हातभार लागतो. स्वतःची मदत स्वतः करणे यासाठी बचत वाढविण्यासाठी आर्थिक व सामाजिक विकास करण्यासाठी कमीत कमी १० व जास्तीत जास्त २० व्यक्तींनी एकत्र येऊन बचत गट स्थापन केला जातो बचतगटाच्या सदस्याकडून अध्यक्ष व सचिवांची निवड लोकशाही मार्गाने केली जाते. स्वयसहायता बचत गटांचे व्यवस्थापन अध्यक्ष व सचिव आणि त्यांना मदत करणारे इतर पदाधिकारी याच्या सहाय्याने केले जाते. स्वयसहाय्यता बचत गटातील पदाधिकारी व सदस्य नियमित दरमहा ठराविक रक्कम बचत करतात.बचत झालेली रक्कम गरजू सदस्यांना वाजवी दराने अल्पमुदतीची कर्जे दिली जातात.स्वयसहाय्यता बचत गटांची प्रगती लक्षात घेऊन त्यांना त्यांच्या बचतीच्या प्रमाणात स्वर्णजयंती ग्रामस्वयंरोजगार योजनेअंतर्गत व्यवसाय कर्ज व अनुदान उपलब्ध करून दिले जाते. ह्यामध्ये जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडून तसेच बँकेकडून महत्त्वाची भूमिका निभावली जाते. बँकेच्या अधिकारी असोत किंवा वेगवेगळया स्वयंसेवी संस्थाचे प्रतिनिधी असोत ते गावात जाऊन महिलांची बैठक घेतात बचत गट म्हणजे काय समजावून सांगतात बचतीचे महत्त्व समजावून सांगतात. भारतात सन २०२२ मध्ये ७४७९५६२ एवढी स्वयंसहाय्यता बचत गटांची संख्या असून त्यापैकी जवळपास ८० % महिलांना सरकारच्या माध्यमातून संघटीत करून महिलांना गतिशील करण्यात आले.आहे महिला बचत गटांनी आर्थिक उपक्रम सुरु केले आहेत. महिला बचत गटाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील महिलांच्या सशक्तीकरणाला मोठी गती मिळाली आहे.

महाराष्ट्रातील बचत गट –

महाराष्ट्रातील बचत गटांची संख्या जिल्हानिहाय कोष्टकात दिली आहे.

| अ.न | जिल्हा | नवीन | पुनरुज्जीवन | पूर्व (NRIM) | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | अहमदनगर | 9652 | 2677 | 640 | 12969 |
| | अकोला | 9943 | 1174 | 459 | 11576 |
| | अमरावती | 16142 | 3017 | 547 | 19706 |
| | औरंगाबाद | 7744 | 2706 | 103 | 10553 |
| | बीड | 17055 | 2513 | 01 | 19569 |
| | भंडारा | 7082 | 4367 | 1128 | 12577 |
| | बुलढाणा | 15355 | 3389 | 573 | 19317 |
| | चंद्रपूर | 8844 | 9051 | 36 | 17981 |
| | धुळे | 7423 | 1708 | 572 | 9703 |
| | गडचिरोली | 10430 | 812 | 3913 | 15155 |
| | गोंदिया | 10256 | 1241 | 4880 | 16377 |
| | हिंगोली | 5875 | 1070 | 296 | 7241 |
| | जळगाव | 17447 | 1716 | 1048 | 20247 |
| | जालना | 15463 | 603 | 1516 | 17582 |
| | कोल्हापूर | 11520 | 2491 | 493 | 14504 |
| | लातूर | 12823 | 2331 | 481 | 15646 |
| | नागपूर | 9587 | 3717 | 68 | 13372 |
| | नांदेड | 10772 | 2398 | 746 | 13916 |
| | नंदुरबार | 13284 | 2485 | 281 | 16055 |
| | नाशिक | 16093 | 3416 | 104 | 19613 |
| | उस्मानाबाद | 11971 | 2206 | 127 | 14304 |
| | पालघर | 14952 | 3006 | 1164 | 19122 |
| | परभणी | 9422 | 953 | 631 | 11006 |
| | पुणे | 10490 | 2850 | 259 | 13599 |
| | रायगड | 7532 | 3734 | 1336 | 12602 |
| | रत्नागिरी | 12924 | 1440 | 1591 | 15955 |
| | सांगली | 7527 | 1464 | 155 | 9146 |
| | सातारा | 9006 | 1796 | 835 | 11637 |
| | सोलापूर | 19277 | 1046 | 566 | 20889 |
| | सिधुदुर्ग | 6504 | 1769 | 2006 | 10279 |
| | ठाणे | 7293 | 906 | 2304 | 10503 |
| | वर्धा | 10783 | 3497 | 04 | 14284 |
| | वासिम | 7273 | 2151 | 03 | 9427 |
| | यवतमाळ | 19904 | 2525 | 2111 | 24540 |

source – https://nrim.gov.in/shgreport



संपूर्ण महाराष्ट्रातील जिल्हा निहाय बचत गटांची संख्या वरील कोष्टकात दिली आहे. यवतमाळ,सोलापूर आणि जळगाव या जिल्ह्यांनी २०००० बचत गटांचा


टप्पा ओलांडला आहे आणि त्यापाठोपाठ अमरावती,बीड,बुलढाणा,नाशिक आणि पालघर या जिल्ह्यांनी १९००० बचत गटांचा टप्पा पार केला आहे.

सांगली,वाशीम हिंगोली या जिल्ह्यात बचत गटांची संख्या थोडी कमी आहे. असे असले तरी महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यातील सरासरी बचत गटांची संख्या जवळ जवळ १५००० इतकी असल्याचे दिसून येते. म्हणून असे म्हणता येईल कि महाराष्ट्र राज्यात बचत गटांचे अस्तित्व आणि त्यांची आर्थिक स्थिती चांगली आहे.

- तालुका निहाय बचत गट – कोष्ट क्र.३

| अ न | तालुका | बचत गटांची संख्या |
|---|---|---|
| 1 | आजरा | 881 |
| 2 | गगनबावडा | 641 |
| 3 | भुदरगड | 1578 |
| 4 | चंदगड | 1255 |
| 5 | गडहिंग्लज | 1189 |
| 6 | हातकणगले | 2320 |
| 7 | कागल | 1466 |
| 8 | करवीर | 2370 |
| 9 | पन्हाळा | 1310 |
| 10 | राधानगरी | 1570 |

संदर्भ जिल्हा परिषद कोल्हापूर




वरील कोष्टकावरून असे दिसून येते की, हातकणगले आणि करवीर तालुक्यांनी २३०० बचत गटाचा टप्पा पार त्यानंतर भुदरगड ,राधानगरी,तालुक्यांनी १५०० इतक्या बचत गटांचा टप्पा पार केला आहे. त्यानंतर कागल चंदगड आणि गडहिंग्लज या तीन तालुक्यामध्ये सरासरी १३०० इतके बचत गट असल्याचे दिसून येत आजरा आणि गगनबावडा या दोन तालुक्यात सरासरी ७६१ इतकी बचत गटांची सख्या आहे.

- चंदगड तालुक्यातील बचत गटांचे व्यवसाय –

चंदगड तालुल्क्यामध्ये बचत गटांच्या बाबतीत पूर्ण जागरूकता निर्माण झाली आहे.दिवसेदिवस नवनवीन बचत गटांची स्थापना होत असून या तालुक्यात बचत गटाने चळवळीचे स्वरूप धारण केले आहे. प्रत्येक महिला बचतगट कोणत्या न कोणत्या तरी व्यवसाय करण्याच्या जिद्दीने उभा राहिला आहे. त्यामुळे या तालुक्यात महिला बचत गटाद्वारे चालविल्या जाणाऱ्या बचत गटाच्या व्यवसायाचे जाळे तालुक्यामध्ये पसरले आहे.चंदगड तालुक्यातील हजारो महिलांचे संसार नव्याने फुलवणारी रणरागिणी चंदगड तालुक्यातील सदारवाडी येथील आहे . तिचे नाव आहे. विद्याताई मुकुंद तावडे. विद्याताई तावडे यांनी २५० महिला बचतगट तयार केले हे करत असताना महिलांची होणारी परवड त्यांच्यावर होणारा अन्याय त्यांनी जवळून पहिले.त्यामुळं त्या महिलांना त्यातून बाहेर काढून त्यांना न्याय मिळवून दिला बचत गटाच्या माध्यमातून मुस्लीम समाज व दलित समाज याचे गट तयार केले. महिलांना आर्थिक स्थैर्य देण्यासाठी त्यांनी दिशा सामाजिक संस्थेच्या माध्यमातून महिला बचत गटामार्फत ,नाचणी,नाचणी पापड,नाचणी पीठ,लोणचे चटण्या व अन्य उत्पादने तयार केली बचत गटाच्या माध्यमातून स्वतः बरोबर इतर बचत गटातील महिलांना सोबत घेऊन त्यांची प्रगती आत्मविश्वास प्रतिष्ठा महिलांना रोजगार मिळवून देण्याचे मोठे काम विद्याताईने केले त्यामुळे बचत गटाच्या माध्यमातून महिलांचा विकास

साधण्यास मदत झाली महिला बचत गट माध्यमातून महिलांच्या हाताला काम देण्यासाठी गृह उद्योग सुरु केले आहेत.त्याला चांगला प्रतिसाद आहे.

तसेच माजी सैनिकांच्या पत्नीनीही बचत गट निर्मिती करून उत्पन्नाचा नवीन स्त्रोत शोधला आहे. चंदगड तालुक्यातील कागणी येथील जिजाऊ माजी सैनिक महिला बचत गटाने बस विकत घेऊन ती भाडे कराराने पुणे महानगर पालिकेला दिली आहे.या बसच्या माध्यमातून या बचत गटाला गेल्या चार वर्षापासून ३५ लाखाचे उत्पन्न मिळाले आहे.

तालुक्यामध्ये बँक ऑफ इंडिया,देना बँक महाराष्ट्र युनियन बँक स्टेट बँक ऑफ इंडिया के.डी.सी. बँक या बँकांतून बचत गटांची खाती आहेत.चंदगड तालुक्यात १२०० हून अधिक बचत गट आहेत.त्यापैकी मोजकेच बचत गट उल्लेखनीय आहेत. यांचे कार्य हि कौतुकास्पद आहे. कोवाड येथील संत रोहिदास बचत गटाने चर्म उद्योग सुरु केला आहे.कागणी येथील म्हम्मादेवी बचत गटाने सामुहिक शेती केली आहे. तेऊरवाडी येथील भाग्य लक्ष्मी व जागृती महिला बचत गटांनी म्हैस पालन व्यवसाय सुरु केला आहे. बचत गटांना त्यांच्या व्यवहाराप्रमाणे ५० हजार ते ५ लाखापर्यंत सद्या कर्ज पुरवठा केला जातो. काही बचत गटांनी सामुहिक उद्योग करून आपली प्रगती साधली आहे. तर काहींनी वैयक्तिक हितासाठी कर्जाच्या पैशाचा वापर केल्याने त्यांचा आर्थिक स्तर उंचावण्यास मदत झाली आहे. बचत गटांच्या माध्यमातून पटकन आणि सहज सुलभ पद्धतीने कर्ज उपलब्ध होते. तसेच व्याजाचा दरही कमी असतो त्यामुळे अडी अडचणीच्या वेळेची आर्थिक गरज सावकाराकडून कर्ज न घेता भागवता येते. बचत गटाच्या निमित्ताने बचत गटातील महिलांना व्यवहार करावे लागतात. त्यामुळे व्यावहारिक ज्ञानात सुद्धा भर पडते. बचत गटांमुळे महिलांच्या संघटनांचे महत्त्वाचे कार्य हि पार पडते सर्वांनी मिळून बचत गट चालविला जात असल्यामुळे एक जुटीची भावना निर्माण होते त्यातून एकमेकांना सहकार्य होत आहेत.परस्पराबद्दल विश्वास निर्माण होण्यास मदत झाली आहे.

- बचत गटाच्या माध्यमातून महिलांच्या विकासात साध्य झालेल्या बाबी ---

महिलांमध्ये एकी व संघटन निर्माण झाले – बचत गटाच्या माध्यमातून विविध जातीच्या धर्माच्या व गरजू महिलांना एकत्र आणण्याचे काम बचतगटांनी केलेले आहे. एकमेकींच्या अडीअडचणी समजावून घेऊन एक दुसरीच्या सुख दुखाच्या विचार करण्यासाठी १० ते २० महिलांनी एकत्रित येऊन बचतगटाची स्थापना केलेली आहे. बचत गटातील महिला आप आपसात विचारांची देवाण घेवाण करतात त्यामुळे ह्यातून महिलांमध्ये एकी व संघटन तयार होते. अशा प्रकारे एक माणूस म्हणून जगण्याचा अधिकार महिलांना मिळावा म्हणून महिलांनी बचत गटाच्या माध्यमातून महिलांमध्ये संघटन शक्ती निर्माण करून संघटन शक्तीच्या बळावर स्वय रोजगाराच्या दिशेने वाटचाल सुरु केली आहे.

- महिलांना बचतीची सवय लागली ---

बचत गटाच्या मध्ये आजची बचत हि उद्याच्या कामाला येते हि भावना त्यांच्यात निर्माण झाली बचतीची एक चांगली सवय लागल्यामुळे भविष्यातील विविध गोष्टींचे नियोजन करण्यात अडचण येत नाही महिलांना आपल्या दैनदिन अडचणी सोडविणे सहज शक्य झाले.स्वतःची आर्थिक परिस्थिती सुधारण्याकरिता बीज भांडवल तयार करणे महिलांना शक्य झाले .

- महिलांना शिकण्याची संधी मिळाली –

महिलांनी जीवन जगणे म्हणजे केवळ “चूल व मुल” एवढ्यापुरतेच नाही तर त्याही पलीकडे जगणे आहे. हि भावना महिलांच्या मध्ये निर्माण झाली. बचत गटाच्या माध्यमातून नवीन शिकण्याची संधी मिळाली बँकेचे व्यवहार समजू लागले महिलांच्या व्यवहार ज्ञानात भर पडली महिलांचा व त्या सोबत आपल्या परिवाराचा सर्वांगीण विकास करून घेण्याची संधी बचत गटाच्या माध्यमातून निर्माण झाली.

- बचत गटामुळे महिलांमध्ये उद्योग वाढीला चालना मिळाली ----

महिला बचत गटाच्या सदस्यांनी जमा केलेल्या बचतीतून अनेक उद्योग व्यवसाय सुरु केलेले आहेत.चंदगड तालुक्यामध्ये अनेक महिला बचत गटांनी महिला आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून दिनदयाळ अंत्योदय योजना महिला किसान सशक्तीकरण योजना इत्यादी राज्य सरकार व केंद्र सरकार यांच्या मदतीने आणि मार्गदर्शनाने अनेक उद्योग निर्माण केले आहेत.

- निर्णय घेण्याची क्षमता विकसित झाली.-----

महिलांना या बचत गटाच्या माध्यमातून व बचत गटातील सक्रीय सहभागामुळे जीवनात येणारे विविध प्रश्न व समस्यांना आत्मविश्वासाने सामोरे जाण्याचे धाडस निर्माण झाले स्वतःच्या व समाजाच्या जीवनात येणाऱ्या अनेक लहान मोठ्या प्रश्नांची जाणीव होऊन ते प्रश्न कसे सोडवावेत या विचार प्रणालीने आकार घेतला आज बचत गटातील महिलांना कोणताही

निर्णय घेताना कोणावरही विसंबून राहावे लागत नाही परिणामी बचत गटातील महिलांची स्वतःच्या विकासाकडून सामाजिक विकासाकडे वाटचाल होऊ लागली.

- महिलांच्या ज्ञानात भर पडली -

महिलांचे केवळ "चूल आणि मुल" हेच कार्यक्षेत्र होते घरांच्या चार भिंतीच्या बाहेर काय चालले आहे याची महिलांना अजिबात माहिती नव्हती. पुरुषप्रधान संस्कृती मध्येच महिला अडकल्या होत्या परंतु बचत गटात सहभागी झाल्यानंतर महिलांचा स्वतःकडे पाहण्याचा दृष्टीकोन संपूर्णतः बदलेला आहे.आता त्यांना स्वतःच्या पायावर उभे राहण्याची तळमळ निर्माण झाली आहे. बचत गटाच्या माध्यमातून विविध व्यवसाय, छोटे मोठे उद्योग यांचे ज्ञान प्राप्त करीत आहेत.उद्योग सुरु करण्यासाठी आवश्यक असलेले ज्ञान प्रशिक्षण शिबिरातून प्राप्त केले आहे.

- महिलांच्या आर्थिक स्वावलंबन निर्माण झाले –

देश स्वातंत्र्य झाल्यापासून महिला आर्थिक स्वावलंबनाच्या अनेक योजना आल्या व गेल्या पण निष्पन्न काहीच झाले नाही. मात्र बचत गटाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील महिलांच्या विकासात एक परिवर्तन घडून आले . बचत गटातील महिला सामुहिक, वैयक्तिक बँकेच्या आर्थिक सहकार्याने शेती सोबत लघुउद्योग सुरु करून आर्थिक स्वावलंबन प्राप्त केले आहे.

- **निष्कर्ष**

बचत गट हा महिलांचा केवळ आर्थिक विकासाचा मार्ग नसून महिलांच्या सर्वांगीण विकासाचे एक महत्त्वाचे साधन म्हणून बचत गटाकडे पहिले जाते.महिलांना दिले जाणारे विविध प्रकारचे प्रशिक्षण, बाहेरील जगाचा अनुभव, संघटन कौशल्य व कार्याचा, विचारांचा प्रभाव यामुळे महिलांमध्ये आत्मविश्वासाची निर्मिती झाली आहे.घरात,समाजात, गावात, महिलांची पत व सामाजिक दर्जा निर्माण झाला बचत गट हे स्वावलंबनाचे, मानसिक, वैचारिक, आर्थिक आणि सामाजिक उन्नतीचे एक उत्तम माध्यम आहे. बचत गटांमुळे महिलांच्या नेतृत्वांत गतिशीलता व त्याच सोबत आत्मविश्वास वाढण्यास मदत झाली. बचत गटांमुळे महिलांना स्वतःच्या पायावर उभे राहून भविष्यामध्ये देशासाठी, समाजासाठी काहीतरी करावे हि जाणीव निर्माण होऊ लागली. समाजातील महिलांनी एकत्र येऊन महिला बचत गटांची निर्मिती करून कुटुंब, समाज, स्वतः व राष्ट्राचा विकास व प्रगतीला हातभार लावला आहे.

- **संदर्भ –**

1. मुल्लाणी प्रा.एम यु. महिला स्वयंसहाय्यता बचत गट डायमंड पब्लिकेशन पुणे
2. प्रा.शिल्पा कुलकर्णी – भारतातील महिला विकासाची वाटचाल
3. डॉ. वैरागडे उज्वला प्रा.मुळे विद्युलता सामुदायिक विकास विस्तार शिक्षण व महिला सबलीकरण विद्या प्रशासन औरंगाबाद
4. महिला दिन विशेषांक
5. Chif, Editer, Prof. A. P. Patil- Challenges Before women Empowerment
6. दैनिक – सकाळ,लोकमत,लोकसत्ता इत्यादी
7. मासिक जानेवारी २००८
8. विविध वेबसाईट
9. अर्थसवाद – जानेवारी ,फेब्रुवारी,मार्च २०२२